"महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर येथील १९५ कर्मचाऱ्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून दिनांक ०१.०४.२००६ ते दिनांक २५.११.२०१४ या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी देणेबाबत."

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांकः हातमाग-२०२१/प्र.क्र.२४०/टेक्स-३

नविन प्रशासन भवन, १४ वा मजला

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : ०९ जून, २०२५

वाचा :

१) शासन समपत्र क्रमांक हातमाग-२०२१/प्र.क्र.२४०/टेक्स-३, दिनांक ०५.०८.२०२४ व दिनांक २०.८.२०२४.

२) आयुक्त (वस्त्रोद्योग),वस्त्रोद्योग आयुक्तालय,नागपूर यांचे पत्र क्रमांक जा.क्र./कार्या-२/ हातमाग/महामंडळ कर्म थकबाकी/ब-३१७/७०९२/२०२४ , दिनांक २८.०८.२०२४ व दिनांक ०५.०९.२०२४.

३) वस्त्रोद्योग आयुक्तालय,नागपूर यांचे पत्र क्रमांक जा.क्र./कार्या-२(१)/ हातमाग/महामंडळ ठराव प्रत/२०५ /२०२५ , दिनांक १३.०१.२०२५.

४) दि.२७.०५.२०२५ रोजीचे मा.मंत्रीमंडळ बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर येथील १९५ कर्मचाऱ्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून दिनांक ०१.०४.२००६ ते दिनांक २५.११.२०१४ या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी देणेबाबत मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९.०७.२०२४ रोजी दालन क्रमांक ३२,विधान भवन,मुंबई येथे सायंकाळी ०४.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मा. उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांनी दिलेल्या निर्देशास अनुसरून महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर येथील १९५ कर्मचाऱ्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून दिनांक ०१.०४.२००६ ते दिनांक २५.११.२०१४ या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी देणेबाबत दिनांक २८.०८.२०२४, दिनांक ०५.०९.२०२४ व दिनांक १३.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त (वस्त्रोद्योग) यांनी सदर प्रस्ताव सादर

केला आहे. या अनुषंगाने दि.२७.०५.२०२५ रोजी मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर येथील १९५ कर्मचाऱ्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून दिनांक ०१.०४.२००६ ते दिनांक २५.११.२०१४ या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर येथील १९५ कर्मचाऱ्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून दिनांक ०१.०४.२००६ ते दिनांक २५.११.२०१४ या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी एकूण रक्कम रूपये ११,९०,६९,४६३/- (अक्षरी-अकरा कोटी नव्वद लक्ष एकोणसत्तर हजार चारशे त्रेसष्ट रूपये) प्रदान करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त विशेष बाब म्हणून देण्यात येणाऱ्या थकबाकीच्या रक्कमेसाठी नवीन लेखाशिर्ष निर्माण करून वित्त विभागाकडून निधी उपलब्ध करून घेण्याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०६०९१७३२१७९४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PATHAN ANJUM BANO RASHIDKHAN

Digitally signed by PATHAN ANJUM BANO RASHIDKHAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=c6a8800841f0173430c13770d9d86bc16cf387b050d3c5c9ebcedbbd3dcf07f3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D0F333CC391EF2D7D49DC6FD87E92EB9303FC9A19FD00938A0D8AE79AD2EB1F7, cn=PATHAN ANJUM BANO RASHIDKHAN
Date: 2025.06.09 17:33:30 +05'30'

(अंजुम पठाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृह निर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.
५. मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (वस्त्रोद्योग) महाराष्ट्र राज्य नागपूर तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर.

८. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
९. उपसचिव (टेक्स ३), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.उपसचिव (अर्थसंकल्प), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४.वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई.
१४.प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग), मुंबई/नागपूर/औरंगाबाद/सोलापूर.
१५. निवड नस्ती (टेक्स-३)